सत्यमेव जयते


# महाराष्ट्र शासन
## कृषि विभाग
## नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प

**३० अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई ४०० ००५**

दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३३५१/५२ ई-मेल :-mahapocra@gmail.com


जा क्र. नादेकृसंप्र- ०२२५/प्र.क्र.३८ /कृ.अ./ २४१/२०२५ दि. १७ / ०३/२०२५

प्रति,

**विभागीय कृषि सहसंचालक,**
**(नाशिक, अमरावती, लातूर, नागपूर, छ. संभाजीनगर)**

**विषय:- प्रकल्पांतर्गत मृद व जलसंधारण कामांसाठी स्थळ निश्चितीबाबत.**

**संदर्भ** :- १) शासन निर्णय क्र.- नादेकृ ४६२२/प्र.क्र.९४/८-अे, दि. ३०.०६.२०२३.
२) शासन निर्णय क्र.- नादेकृ ४६२२/प्र.क्र.९४/८-अे, दि. १४.१०.२०२४.
३) संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे यांचे पत्र क्र. ४१२५ दि. २४.०२.२०२५.

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी राज्यातील २१ जिल्ह्यांतील ७११८ गावे निवडली आहेत. सदर निवडलेल्या गावांमध्ये मृद व जलसंधारणाशी संबंधित विविध कामे राबविण्याचे प्रस्तावित असून प्रकल्पांतर्गत मृद व जलसंधारण कामे ही कृषि विभागाच्या प्रचलित तांत्रिक व आर्थिक मापदंडानुसार राबविली जाणार आहेत. प्रकल्पांतर्गत निवडलेल्या गावांमध्ये सूक्ष्मनियोजन प्रक्रिया सुरू होत असून, गावात राबविण्यात येणाऱ्या मृद व जलसंधारण कामांचा समावेश गाव अनुकूलन आराखड्यात केला जाणार आहे. सदरील आराखड्या मध्ये प्रस्तावित कामे तांत्रिकदृष्ट्या व्यवहार्य असल्याची खात्री करण्याची जबाबदारी क्षेत्रीय अधिकाऱ्यांची आहे.

संदर्भ क्र. ३ अन्वये मृद व जलसंधारण कामांसाठी उपचारनिहाय स्थळनिश्चिती करण्याचे अधिकारबाबत पत्र सोबत संलग्न करण्यात येत असून त्या अनुषंगाने आराखड्यामध्ये कामे अंतिम करण्यापूर्वी सबंधित जबाबदार क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी यांनी पाहणी करूनच प्रस्तावित कामांची स्थळ निश्चिती अंतिम करावी. जेणेकरून तयार होणारा आराखडा हा तांत्रिकदृष्ट्या व्यवहार्य होईल व तसेच आराखड्याची अंमलबजावणी करणे सोयीचे ठरेल.

सोबत :- संदर्भ क्र. ३ चे पत्र.

Parimal, 17/3

**(परिमल सिंह)**
**प्रकल्प संचालक**
**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प**

प्रत:-

१. संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे यांना माहितीस्तव.
२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, (प्रकल्पातील सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव.
३. उपविभागीय कृषि अधिकारी, (प्रकल्पातील सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव.

महाराष्ट्र शासन

कृषी संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१. दूरध्वनी क्रमांक ०२०-२६०५५३२२/२६०५५३२३

ई मेल आयडी-jdasoil2020@gmail.com

जा.क्र.कृषीआ/मृदसं/मृद६/ स्थळनिश्चिती ४९२५ /२०२५. दिनांक : २४ फेब्रुवारी , २०२५.

प्रति,

मा. प्रकल्प संचालक,

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प,

३० ब अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड,

मुंबई-४१०००५.

विषय : मृद व जलसंधारण कामांसाठी स्थळ निश्चितीबाबत .

संदर्भ : आपले पत्र जा. क्र. नादेकृसंप्र ०२२५/प्र. क्र.३८/कृ. अ./१७४/२०२५,दि.१८ फेब्रुवारी २०२५.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, मृद व जलसंधारण उपचारांच्या प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपचार निहाय स्थळनिश्चिती करण्याचे अधिकार सोबत सहपत्रित केलेप्रमाणे आहेत.

मनोहर मुंढे

सह संचालक (मृ.सं व पाक्षेव्य)

प्रकल्प व्यवस्थापन कक्ष
नानाजी देशमुख कृषि. संजीवनी प्रकल्प, मुंबई
04 MAR 2025
आवक क्रमांक: 609
स्वाक्षरी

PS 5/3
NRM
Sh. Chaukale
Shri. Jadhav.
6/3.

घटक आणि स्थळ निश्चितीचे अधिकार (मृद व जलसंधारण)

| अ.क्र | कामाचे नाव | स्थळ निश्चितीचे अधिकार |
|---|---|---|
| १ | शेत बांध बंदिस्ती (Comartment Bunding)<br>• प्रस्तावित क्षेत्रामध्ये यापूर्वी कामे झालेली असल्यास<br>• नवीन कामे | तालुका कृषि अधिकारी |
| २ | ढाळीचे बांध बंदिस्ती (Graded Bunding)<br>• प्रस्तावित क्षेत्रामध्ये यापूर्वी कामे झालेली असल्यास<br>• नवीन कामे | तालुका कृषि अधिकारी |
| ३ | सलग समतल चर | मंडळ कृषि अधिकारी |
| ४ | खोल सलग समपातळी चर | मंडळ कृषि अधिकारी |
| ५ | मजगी (Terracing) | तालुका कृषि अधिकारी |
| ६ | भात खाचर बांध बंदिस्ती (Paddy Bunding) | तालुका कृषि अधिकारी |
| ७ | जुन्या भातखाचरांची बांध दुरुस्ती करणे | तालुका कृषि अधिकारी |
| ८ | अनगड दगडाचे बांध | मंडळ कृषि अधिकारी |
| ९ | गॅबियन बंधारा | मंडळ कृषि अधिकारी |
| १० | संयुक्त गॅबियन बंधारा | तालुका कृषि अधिकारी |
| ११ | माती नाला बांध | तालुका कृषि अधिकारी |
| १२ | सिमेंट नाला बांध | ३० मी. पर्यंत -उपविभागीय कृषि अधिकारी<br>३० ते ५० मी. पर्यंत - विभागीय कृषि सहसंचालक |
| १३ | नाला खोलीकरण | उपविभागीय कृषि अधिकारी |
| १४ | सिमेंट नाला बांध दुरुस्ती | उपविभागीय कृषि अधिकारी |
| १५ | नवीन बोडी तयार करणे | तालुका कृषी अधिकारी |
| १६ | बोडी दुरुस्ती | तालुका कृषी अधिकारी |
| १७ | शेततळे | मंडळ कृषि अधिकारी |

कृषि सह संचालक
मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन
कृषि आयुक्तालय म राज्य, पुणे-१